# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १११–२०१०/ दिनांक :

श्री. बाळू यंशवंत लोहार,
मु. पो. राजापूर, तासगांव, जि. सांगली — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली — विरूध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
ग्रामीण विभागीय कार्यालय, सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, तासगांव २, जि. सांगली

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. बाळू यंशवंत लोहार, मु. पो. राजापूर, ता. तासगांव, जि. सांगली यांनी नवीन शेतीपंपासाठी वीज कनेक्शन मिळावे यासाठी दि. ६.२.२०१० रोजी वि.प.कडे अर्ज केला. तक्रारदाराचे म्हणण्यानुसार दि. ५.३.२०१० पर्यंत चलन मिळणे जरुरी होते. तसे झाले नाही, त्यामुळे प्रस्तुतची तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार यांनी फी रु. ५०/– पावती क्र. ८८८२३२८ दि ६.२.२०१० ने भरली आहे. तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. १३.५.२०१० रोजी रितसर तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने दि. १८.५.२०१० च्या आदेशानुसार तक्रारदारास एस.ओ.पी. प्रमाणे भरपाई द्यावी असे आदेश केले आहेत. तक्रारदार यांनी दि. ४.६.२०१० रोजी अनुसूचि अ मध्ये मंचाकडे तक्रार दाखल केली. त्यामध्ये त्यांनी विलंबापोटी कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. २५.६.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदाराचा शेतीपंप वीज पुरवठ्यासाठी दि. ६.२.२०१० रोजी अर्ज प्राप्त झाल्याचे मान्य केले आहे व त्यांस दि. ७.५.२०१० रोजी चलन देण्यात आले आहे. तसेच तक्रारदाराने तक्रार मागे घेतली असल्याबद्दलच्या पत्राची छायांकीत प्रत जोडली आहे.

प्रस्तुतची तक्रार दि. २८.६.२०१० ला मंचासमोर सुनावणीस घेतली असतां, तक्रारदार हजर नव्हते. वि.प.तर्फे श्री. कोहळी, कनिष्ठ अभियंता, तासगांव २ उप विभाग हजर होते. मंचाने तक्रारदारास मंचासमोर हजर राहून तक्रार मागे घेतल्याबद्दलचे पत्र देण्याबाबत आदेश दिले. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी दि. १३.७.२०१० रोजी मंचासमोर समक्ष हजर राहून वीज कनेक्शन मिळाल्यामुळे तक्रार मागे घेत असल्याचे लेखी पत्र दिले. खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) तक्रारदार यांस मागणी केल्याप्रमाणे विलंबापोटी भरपाई मिळणे योग्य होईल काय ?

उत्तर : नाही

आदेश ?

खालील प्रमाणे.

<u>कारणमिमांसा</u>

तक्रारदार यांनी नवीन शेतीपंपाच्या कनेक्शनसाठी दि. ६.२.२०१० रोजी अर्ज करुन फी रु. ५०/– भरली आहे. दि. ७.५.२०१० ला चलन देण्यात आले आहे मंचासमोर वि.प.च्या अधिकाऱ्यांनी दि.२५.६.२०१० रोजी मंचाला अग्रेषित केलेल्या लेखी निवेदनात चलन देण्यास विलंब झाल्याचे मान्य केले. परंतु तक्रारदार यांनी कनेक्शन मिळाल्यामुळे तक्रार मागे घेत असल्याचे दि. १३.७.२०१० रोजी मंचासमोर हजर राहून सांगितले व त्याप्रमाणे पत्र दिले. त्यामुळे मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देणेत येत आहे. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) तक्रार निकाली काढणेत येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : (जी.बी.पानकर,)
सदस्य सचिव

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष